महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील
अपील क्रमांक :- १५५९/२०२०

अपिलार्थी :- श्री. विजय नामदेवराव नेरकर,
संकट मोचन रोड खुशाल किराणा जवळ उमरसरा यवतमाळ,
ता.जि. यवतमाळ.

विरुध्द

उत्तरार्थी :- १. जन माहिती अधिकारी तथा नगर रचना विभाग,
नगर परिषद कार्यालय, यवतमाळ ता.जि.यवतमाळ.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, यवतमाळ ता.जि.यवतमाळ.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक :- १३.०८.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या पत्राचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०८.२०१९ | निरंक | १७.१०.२०१९ | निरंक |

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये **जोडपत्र 'क'** या नमुन्यात आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील अर्ज दिनांक १८.०९.२०२० रोजी दाखल केला. सदर अपील दाखल करण्याच्या प्रयोजनामध्ये *" माहिती अजुनही अप्रापत "*, असे नमूद केले आहे.

द्वितीय अपील सुनावणीस अपिलार्थी श्री.विजय नामदेवराव नेरकर अनुपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.हरिश जाधव, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय देशपांडे व सहायक जन माहिती अधिकारी श्री. व्हि.पी.आजनकर उपस्थित आहेत.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नूसार अपीलार्थी यांनी **जोडपत्र - अ** या नमुन्यात जन माहिती अधिकारी यांचेकडे रीतसर अर्ज दाखल करुन त्यामध्ये "*१) श्री. चव्हाण यांनी बांधकाम करण्यास परवानगी करीता दिलेल्या अर्जाच्या साक्षांकीत प्रती. २) न. प. यवतमाळ यांनी बांधकाम करण्यास परवानगी दिली असल्यास परवानगीच्या सत्यप्रती. ३) श्री चव्हाण यांनी केलेल्या बांधकामाची तपासणीची जबाबदारी असलेल्या अधिकारी / इंजिनिअर यांनी भेटी देऊन तपासणी केली असल्यास तपासणीच्या अहवालाची सत्यप्रत पुरविण्यात यावी. ४) परवानगी न घेता बांधकाम केले असल्यास माझ्या दि.०५.०७.२०१९*

*च्या अर्जाप्रमाणे नगर परिषद यवतमाळ यांनी कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती पुरविण्यात यावी."* इ. माहिती व्यक्तीश: मागितली होती.

मात्र अपिलार्थीला अभिप्रेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून दिनांक १७.१०.२०१९ रोजी कलम १९ (१) नुसार **जोडपत्र-ब** मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन त्याच्या कारणामध्ये "*मागणी केलेली माहिती पुरविण्यात आली नाही*" असे नमूद केले आहे.

अपिलकर्ता यांनी दि. २७.०८.२०१९ रोजी श्री. चव्हाण यांनी बांधकाम करण्यास परवानगी करीता दिलेल्या अर्जाच्या सक्षांकीत प्रती तसेच परवानगी न घेता बांधकाम केले असल्यास दि. ०५.०७.२०१९ च्या अर्जाप्रमाणे कोणती कार्यवाही केली याबाबत व त्या अनुषंगीक माहिती मागितली होती. माहिती न मिळाल्यामुळे दि. १७.१०.२०१९ रोजी जोडपत्र-ब या नमुन्यात प्रथम अपील दाखल केले. प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपील झाल्याचे आढळून येत नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अमर गवई यांनी दि. १२.०८.२०२६ पत्र क्र. १९२ अन्वये आयोगास कळविले की, कार्यालयीन अभिलेखात शोध घेताला असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याबाबत कोणतेही दस्तऐवज आढळून आले नाही. मात्र श्री. गवई यांनी देखील माहिती पुरविण्याकरिता प्रलंबित माहिती अधिकार अर्जाचे बाबत माहिती पुरविण्याची जाबाबदारी पार पाडली नाही.

वरील बाब लक्षात घेता, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

**अंतरिम आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. व तसा अहवाल पुढील सुनावणीचे वेळी आयोगास सादर करावा.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संजय देशपांडे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अमर गवई यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २७.०८.२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा

त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या आदेशाची एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संजय देशपांडे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अमर गवई यांना देवून त्यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीचे वेळी समक्ष उपस्थित राहुन सादर करण्याबाबत सूचना द्याव्या व तसा अहवाल पुढील सुनावणीचे वेळी आयोगास सादर करावा.

४. प्रस्तुत प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक २१.०८.२०२६ रोजी ११.१० ०० वा. घेण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

**(रविंद्र ठाकरे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १३.०८.२०२६**
जावक क्रमांक ६३०३ दिनांक 19 AUG 2026

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती